# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/07/2023 (शनिवार) दुपार

---

## विनयभंग

**१) पो.स्टे. जलालखेडा :-** दिनांक २८/०६/२०२३ चे १९.०० वा. ते १९.३० वा. दरम्यान पिडीत मुलगी व आरोपी नामे- तिलक चंद्रशेखर भद्रोलीया, वय २२ वर्ष हे एकाच गावातील रहिवासी असुन यातील आरोपी यांने घटनेच्या १५ दिवसा अगोदर पिडीत अल्पवयीन मुलीला टयुशनला जाताना पाठलाग करुन मोटारसायकल आडवी करुन मोटार सायकलवर बसण्यास म्हटले म्हणुन जवळीक साधण्याचा प्रयत्न केला तसेच आरोपीने आपले फोनवर दिव्याणी सातपुते या नावाने ईंस्टाग्राम वर फेक अकाउंट उघडुन दोन मॅसेज व व्हिडीओ कॉल केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३४२, ३५४ (ड) भांदवि. सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास ठाणेदार मनोज चौधरी पोस्टे जलालखेडा मो. नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड :-** दिनांक ३०/०६/२०२३ चे ११.३० वा. ते १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हिने आरोपी नामे- निरज रूपराव पाटील, रा. पंचवटी काटोल यास ''मी दिलेले पैसे मला कधी परत करता'' त्यावर आरोपी याने म्हटले की तुला जे करायचे ते करून घे मला दयायचे तेव्हा देईन यावर फिर्यादीने म्हटले की माझे मेहनतीचे पैसे आहे मला परत लागेल असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला स्पर्श केला व ढकल ढुकल करून डोक्याला व डाव्या हाताला मारहाण केले व शिवीगाळी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३२३, ५०४ भांदवि. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक गुरूकर मॅडम पोस्टे नरखेड मो. नं ९६६५८३४९९९ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**